दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार


## कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल

**मुंबई-**कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल. त्यामुळे मला यावर प्रतिक्रिया द्यायची नाही, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते पार्थ पवार यांनी काँग्रेसवर टीका केली होती. यावर पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच ते राजकारणात अजून लहान आहेत, त्यामुळे मला त्यांच्यावर काही बोलायचे नाही, असेही पटोले यांनी म्हटले.शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर टीका करताना नाना पटोले म्हणाले, संजय राऊत यांना त्यांच्याच पक्षात कोणी मान्यता देत नाही, त्यामुळे आम्ही त्यांना मान्यता द्यावी असे वाटत असेल तर त्यावर मी काही प्रतिक्रिया देणार नाही.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • गुरुवार दि.९ एप्रिल २०२६ • अंक-८५ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# मिरा-भाईंदरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारणीला गती

## सामाजिक न्याय विभागाकडून १.४६ कोटींची तरतूद-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर, सर्वे क्र. २३३ येथील जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १६ फुटी पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीस गती मिळाली असून, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत मिरा-भाईंदर महापालिकेला १ कोटी ४६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुढील सहा महिन्यांत पुतळा उभारणीची प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या दालनात आयोजित बैठकीनंतर ते बोलत होते. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे सचिव हर्षदीप कांबळे तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधा बिनोद शर्मा शहर अभियंता दीपक खांबित यांच्यासह वरिष्ठ



अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, संबंधित सर्वे क्रमांकातील सुमारे ३८०० चौ.मी. जागा यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासह बहुउद्देशीय इमारत उभारण्यासाठी सुरुवातीला सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात या स्मारकासाठी २० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधीही मंजूर करण्यात आला.

या निधीतून लंडनमधील स्मारकाच्या धर्तीवर ठाणे जिल्ह्यातील पहिले भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मिरा-भाईंदर शहरात साकारले जात आहे.

दरम्यान, आंबेडकर प्रेमी जनतेच्या मागणीचा विचार करून स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून या ठिकाणी १६ फुटी पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा पुढाकार घेतल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

पुतळा उभारणीसाठी सुमारे २०० चौ.मी. जागेची आवश्यकता असून ती सामाजिक न्याय विभागामार्फत महापालिकेला हस्तांतरित करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या २ मे २०१७ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या सर्व प्रक्रियेमुळे मिरा-भाईंदर परिसरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारणीस गती मिळणार असल्याचा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांच्या विरोधात षड्यंत्र

**पुणे । रमेश जयस्वाल**

मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांच्या विरोधात बुलडाणा जिल्ह्यातील चिखली मतदार संघातील माजी आमदार कॉंग्रेसचे नेते राहूल बोंद्रे यांनी जनतेला भडकावून एक अभिमानच सूरू केलेले दिसत आहे राहूल बोंद्रे आमदार असतांना यांनी या मतदार संघाचा विकासच केला नाही सर्व सरकारी पैशा घशात घातला होता त्यांच्या कार्यकाळात सरकारी यंत्रणेचा किती वापर केला होता आणि आमदार फंडातील पैशा कोठे वापर केला होता याचा हिशोब जनतेला देण्याची तसदी बोंद्रे करतील काय रस्ते बकाल झाले होते रस्त्या रस्त्यावर खड्डे पडले होते यांनी आपल्या कार्यकाळात किती मतदार संघाचा विकास केला हे तरी आपण ठरवावे आज



भाजपचे आमदार महाले यांनी अनेक विकासात्मक कामे मतदारसंघात खेचून आणले यात मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांचा मोलाचा वाटा आहे चिखली मतदार संघाचा विकास होत असतांना विरोधकांना सहन होत नसल्या कारणाने विद्याधर महाले यांच्या विरोधात कॉंग्रेसचे नेते चिखली मतदार संघात विरोधाभास निर्माण करत विचित्र चिखल फेक करण्याचा प्रकार केला जात असल्याचे दिसत आहे यात महाराष्ट्र शासना कडून चिखली मतदार संघ आणि जिल्ह्यातील ईतर मतदार संघात विकासात्मक कामे मार्गी लावण्या करिता निधी उपलब्ध करून दिला यांचे वर्चस्व काही नेत्यांना सहन न झाल्याने जिल्ह्यासह मतदार संघात विरोधाभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे भाजी आमदार राहुल बोंद्रे यांनी आपल्या कार्यकाळात कोणते विकास कामे केली आणि सर्वसामान्य जनतेची किती कामे मार्गी लावण्या आली याचा प्रथम लेखाजोखा जाहिर करावा आणि मागचं इतरांवर बोट दाखवावे याची चर्चा या मतदार संघात रंगत आहे.

# मुंबईतील प्रवेशद्वाराला जगन्नाथ नाना शंकरशेट यांचे नांव देण्याची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगपालिकेच्या महापौर सौ रितू तावडे यांची जगन्नाथ नाना शंकरशेट प्रतिष्ठानच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन मुंबईतील वाशी प्रवेशद्वाराला मुंबईचे आद्य शिल्पकार जगन्नाथ नाना शंकरशेट यांचे नांव देण्याचे निवेदन दिले.



त्यावेळी त्यांना शाल, पुष्पगुच्छ, नानांची प्रतिमा, नानांचे चरित्र आणि महापौर निधीसाठी धनादेश देण्यात आला.

त्याच वाशी येथील प्रवेशद्वाराला नाना शंकरशेट यांचे नांव देण्याची ठरावाची सूचना ठाकरे गटाचे नगरसेवक श्री हरी शास्त्री यांनी तशी मागणी केली आहे.

त्यावेळी महापौर सौ रितू तावडे यांनी आस्थेने चौकशी करून सकारात्मक प्रतिसाद दिला.

त्याप्रसंगी उपमहापौर श्री संजय घाडी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुरेन्द्र शंकरशेट, दैवज्ञ परिषदचे अध्यक्ष डॉ गजानन रत्नपारखी, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री दिनकर बायकेरीकर, सरचिटणीस,माजी नगरसेवक ड मनमोहन चोणकर. सरचिटणीस चंद्रशेखर दाभोळकर, सदस्य अश्रिवन उपाध्याय, दिलिप मालणंकर उपस्थित होते.

# उरण तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाची नवीन कार्यकारिणीची निवड

**उरण । विठ्ठल ममताबादे**

बुधवार दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी उरण तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची विशेष सभा पी.एन.पी. माध्यमिक शाळा मोठी जुई येथे संघाचे मावळते अध्यक्ष सुधीर मुंबईकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेसाठी संघाचे संस्थापक अध्यक्ष नाथा नाईक,अरुण घाग,सूरदास राऊत,किशोर भोईर,संतोष



म्हात्रे,प्रवीण पाटील,मिलिंद पट्टेबहादूर,मनोज म्हात्रे, सोनाली कोळी इत्यादी सदस्य उपस्थित होते. या सभेत संघाची नवीन कार्यकारिणी नेमण्यात आली. अध्यक्ष म्हणून मिलिंद पट्टेबहादूर, उपाध्यक्ष सोनाली कोळी, सचिव पदी संतोष म्हात्रे आणि खजिनदार म्हणून प्रवीण पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. सभेच्या सुरुवातीला पी.एन.पी .शाळेचे मुख्याध्यापक किशोर भोईर यांनी सर्वांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. त्यांनी प्रास्ताविकात संघाची स्थापनेपासूनची वाटचाल विशद केली .याप्रसंगी नाथा नाईक,अरुण घाग,सुभाष ठाकूर, संतोष म्हात्रे,कोळी मॅडम,सुधीर मुंबईकर या सर्वांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केले. सुधीर मुंबईकर यांनी सर्वांसाठी भोजनाची उत्तम प्रकारे व्यवस्था केली होती.मोठया उत्साहात सदर सभा संपन्न झाली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि गृहनिर्माणावर भर देणारा सन २०२६-२७ साठी सिडकोचा अर्थसंकल्प सादर

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

सिडको महामंडळाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु. १६,२५० कोटींचा अर्थसंकल्प सादर केला असून नवी मुंबई तसेच परिसरातील नियोजित शहरी विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा विस्तार, प्रादेशिक कनेक्टिव्हिटी बळकटीकरण आणि गृहनिर्माण विकासावर विशेष भर देण्यात आला आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा आढावा घेताना सिडकोने रु. ९,७७४,२३ कोटींचे सुधारित उत्पन्न आणि रु. ९,७७०.२६ कोटींचा खर्च नोंदवला असून रु. ३.९७ कोटींचा अधिशेष साध्य केला आहे. मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करतानाही आर्थिक शिस्त राखल्याचे यावरून स्पष्ट होते.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु. १६,२५० कोटींचे उत्पन्न आणि रु. १६,१५० कोटींचा खर्च अपेक्षित असून रु. १०० कोटींचा अधिशेष अपेक्षित आहे.सन २०२६-२७ साठीचा सिडकोचा अर्थसंकल्प पायाभूत सुविधा, दळणवळण आणि दर्जेदार गृहनिर्माणाबाबतच्या आमच्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देणारा आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, एरोसिटीचा विकास तसेच प्रस्तावित एज्यु सिटी आणि मेडिसिटी, यासोबत मेट्रो लाईन ८ व लाईन २ द्वारे वाढलेले दळणवळण, तसेच प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क आणि इतर धोरणात्मक विकास उपक्रमांच्या नवी मुंबई एक प्रमुख आर्थिक व गुंतवणूक केंद्र म्हणून उदयास येण्यास सज्ज आहे.

विजय सिंघल

उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण कामगिरी: नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ**

गतवर्षातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे (NMIA) कार्यान्वयन होय.

सध्या दररोज ७६ शहरांसोबत सुमारे १५० विमानांद्वारे (एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्स) वाहतूक सुरू असून सुमारे १९,००० प्रवाशांची दररोज वाहतूक होत आहे. एप्रिल २०२६ अखेरीस आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे.




विमानतळाच्या पहिल्या टप्प्यात दरवर्षी २ कोटी प्रवासी आणि ०.५ दशलक्ष टन मालवाहतुकीची क्षमता निर्माण करण्यात आली आहे. ३,७०० मीटर लांबीची धावपट्टी मोठ्या विमानांच्या उड्डाणांसाठी सक्षम आहे. पुढील टप्प्यात टर्मिनल-२, सेंट्रल टर्मिनल कॉम्प्लेक्स, मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब आणि जनरल एव्हिएशन टर्मिनल उभारण्याची योजना असून वॉटर टॅक्सी सेवा आणि फेडएक्स कार्गो हब सुरू करण्याचाही प्रस्ताव आहे.

प्रमुख पायाभूत सुविधा व कनेक्टिव्हिटी प्रकल्प (सन २०२५-२६ मध्ये कामाचा प्रारंभ झालेले प्रकल्प )

**मेट्रो लाईन ८ (CSMIAANMIA)**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडणारी ३४.८९ किमी लांबीची मेट्रो लाईन ८ विकसित करण्यात येत असून त्यामध्ये २० स्थानके असतील. २०३१ पर्यंत या मार्गावर दररोज सुमारे ९.८ लाख प्रवाशांची वाहतूक अपेक्षित आहे.

**नवी मुंबई मेट्रो विस्तार**

सिडकोने मेट्रो लाईन १ए (बेलापूर-एनएमआयए, ३.२ किमी) आणि मेट्रो लाईन २ (पेंढार-एनएमआयए टर्मिनल-४, १५ किमी) या मार्गांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला असून त्यामुळे नवी मुंबई मेट्रो नेटवर्क विमानतळाशी जोडले जाणार आहे.

**ठाणे-एनएमआयए एलिव्हेटेड कॉरिडॉर**

सिडकोकडून ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान २५.३ किमी लांबीचा सहा पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्यात येत आहे. रु. ६,५२१ कोटींच्या अंदाजित खर्चाचा हा प्रकल्प झझझ मॉडेलअंतर्गत राबविण्यात येत असून त्यामुळे ठाणे ते विमानतळ प्रवासाचा कालावधी सुमारे ९० मिनिटांवरून ३० मिनिटांपर्यंत कमी होणार आहे.

**आयकॉनिक इनडोअर लाईव्ह एंटरटेनमेंट अरेना:**

सिडकोकडून नवी मुंबईमध्ये सुमारे २०,००० आसन क्षमतेचा, आंतरराष्ट्रीय दर्जाचा अत्याधुनिक इनडोअर लाईव्ह एंटरटेनमेंट अरेना विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पाला गुंतवणूकदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, अनेक निविदा प्राप्त झाल्या आहेत व अंमलबजावणीच्या पुढील टप्प्याची प्रक्रिया सुरू आहे. या उपक्रमामुळे नवी मुंबई जागतिक स्तरावरील कार्यक्रम आणि मनोरंजनासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत आहे.

**खारघर व्हॅली गोल्फ कोर्स:**

खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचा ९ होलवरून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १८ होलच्या चॅम्पियनशिप गोल्फ कोर्समध्ये विस्तार करण्यात आला आहे. येथे प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (PGTI) - सिडको ओपन २०२५ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

एड्युसिटी:

करंजाडे परिसरात सुमारे १०० हेक्टर क्षेत्रात विकसित होणाऱ्या एड्युसिटीमध्ये १० पर्यंत जागतिक दर्जाच्या विद्यापीठांना स्थान देण्याची योजना आहे. सिडकोने युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ अबर्डीन, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि आयईडी - इस्तितुतो युरोपेओ दी डिझाईन यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर सामंजस्य करार (चेण) केले असून, नवी मुंबईला जागतिक शिक्षण केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

**नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना)**

सिडकोकडून नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) हा एक महत्त्वाचा प्रकल्प विकसित केला जात असून, आधुनिक पायाभूत सुविधा व परवडणाऱ्या गृहनिर्माणाच्या माध्यमातून नियोजित शहरी विस्ताराला गती दिली जात आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धर्तीवर या प्रकल्पाच्या कामांना वेग आला असून, रस्ते तसेच आयकॉनिक पायाभूत सुविधांच्या उभारणीत उल्लेखनीय प्रगती सुरू आहे.

**आर्थिक पायाभूत सुविधा**

आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क - खारघर:

खारघर येथे १५५ हेक्टर क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क विकसित करण्याची योजना असून येथे कॉर्पोरेट कार्यालये, आयटी सेवा, परिषद सुविधा आणि व्यावसायिक क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे.

**इंटिग्रेटेड लॉजिस्टिक्स पार्क:**

जेएनपीए आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान ५६० हेक्टर क्षेत्रात इंटिग्रेटेड लॉजिस्टिक्स पार्क विकसित करण्याचा प्रस्ताव असून आधुनिक गोदामे, कंटेनर फ्रेट स्टेशन आणि पुरवठा साखळी सुविधा उभारण्यात येणार आहेत.

आफ्रिका-भारत आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र (AIIDZ):

खारघर येथे प्रस्तावित आफ्रिका-भारत आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र हा जागतिक दर्जाच्या व्यवसाय, प्रदर्शन आणि सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून भारत-आफ्रिका आर्थिक सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी राबविण्यात येणारा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. अंदाजे २० एकरवर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत एकात्मिक व्यापार, परिषद, प्रदर्शन आणि अतिथ्यविषयक पायाभूत सुविधा यांसह सद्यस्थितीत सिडकोतर्फे अंतिमीकरण करण्यात येत असलेली एसपीव्ही संरचना यांचा समावेश असणार आहे.

प्रादेशिक विकास व पाणीपुरवठा

सिडकोकडून नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र (NAINA) सुमारे २२५ चौ.किमी क्षेत्रात विकसित करण्यात येत असून भविष्यातील शहरी विकासाला चालना मिळणार आहे.

**जलसुरक्षेसाठी प्रकल्प:**

कोंढाणे धरण - ३५० एमएलडी

हेटवणे धरण - १५० ते २७० एमएलडी

बालगंगा धरण - ३५० एमएलडी

कोंढाणे धरण जलावर्धन वितरण व्यवस्था प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच सिडकोने टनेल बोरिंग मशीनच्या साहाय्याने एका महिन्यात सुमारे ८१२ मीटर टनेल खोदण्याचा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे.

या यशाच्या पायावर पुढे जात, सन २०२६-२७ मध्ये सुमारे १९,३०० सदनिकांची नवीन गृहनिर्माण योजना सिडकोकडून राबविण्याचे नियोजन आहे.

सिडकोने स्पष्ट केले आहे की, एकात्मिक पायाभूत सुविधा विकास, शाश्वत शहरी नियोजन आणि नागरिक-केंद्रित विकास यांवर आधारित धोरण कायम ठेवत नवी मुंबईला देशातील सर्वात प्रगत आणि नियोजित शहरांपैकी एक म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न पुढेही सुरू राहील.

# मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या कृपेने व वै ह.भ.प गिरी महाराज व ज्ञानेश्वर माऊली,सुदाम देव महाराज, गुरुवर्य शांती ब्रह्म रामहरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे व महादेव महाराज (तात्या) यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने वार शुक्रवार दि.१०/४/ २०२६ रोजी मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सात दिवस चालणाऱ्या या सप्ताह निमित्त गावामध्ये रोज वेगवेगळ्या नामांकित कीर्तनकारांचे अमृततुल्य असे किर्तन सेवा होणार आहेत तसेच भजन,प्रवचन,हरिपाठ व हरीजागर असे कार्यक्रम होणार आहेत.अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गावामध्ये रोज गावकऱ्यांच्या वतीने व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने सप्ताह निमित्त महापंगतीचे आयोजन करण्यात आले असून रोज सकाळ व संध्याकाळ गावामध्ये वेगवेगळ्या महापंगती होणार असून परिसरातील भावीक भक्तांनी,नागरिकांनी व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.अखंड हरिनाम सप्ताह निमित्त वार शुक्रवार,दि.१७/४/ २०२६ रोजी श्री गुरुवर्य ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकट स्वामी संस्थान निनगुर,आळंदी,पंढरपूर) यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होणार असून नंतर लगेचच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी तसेच गावकऱ्यांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# विक्रोळीत डॉ.अनघा राऊत यांचा सन्मान




**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाच्या वतीने ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून विद्या एज्युकेशन सोसायटीच्या उपमुख्य अधिकारी डॉ.अनघा राऊत यांचा मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व मंडळाची स्मरणिका देऊन सन्मान करण्यात आला.याप्रसंगी मंडळाचे आजीव सभासद व विकास हायस्कूलचे प्रशासकीय अधिकारी मोहन वत्स,यांच्यासह विद्या विकास एज्युकेशन सोसायटीच्या समन्वयक विजया राधाकृष्णन, विकास हायस्कूल मराठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दर्शना कर्नुक, तसेच विकास हायस्कूल इंग्रजी प्राथमिक विभागाच्या सहाय्यक शिक्षिका वंदना सूर्यवंशी आणि मंजुषा पाचपुते.आदि शिक्षक उपस्थित होते.राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त दांपत्य गुरूवर्य प.मराऊत व विद्या प.राऊत यांच्या डॉ.अनघा राऊत या स्नुषा आहेत.तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ.विनय प.राऊत यांच्या त्या पत्नी आहेत.

# सर्वसामान्य वाचकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणारे 'इच्छांचे दीप प्रवाही' पुस्तकाचे ११ एप्रिल रोजी प्रकाशन

**पनवेल । प्रतिनिधी**

डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन या सेवाभावी दांपत्याच्या कार्यस्मृती जागवणारे तसेच 'डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय' यांच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सेवावाटचालीचा सविस्तर आणि प्रेरणादायी आढावा घेणारे ज्येष्ठ पत्रकार, लेखक सुधीर जोगळेकर लिखित 'इच्छांचे दीप प्रवाही' या संग्राह्य पुस्तकाचे प्रकाशन शनिवार, दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणार आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. सेवा, सामाजिक काम, संघटना आणि संस्थात्मक कार्य या विषयांवर ते मार्गदर्शक आणि प्रेरक विचार व्यक्त करतील. प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल येथील प्रसिद्ध ज्येष्ठ नेत्र शल्यविशारद डॉ. सुहास हळदीपुरकर आणि धूतपापेश्वर कंपनी लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत पुराणिक हे उपस्थित राहणार आहेत. 'इच्छांचे दीप प्रवाही' हे पुस्तक डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन यांच्या वैद्यकीय आणि सामाजिक सेवाकार्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडणारे आहे. या पुस्तकामध्ये त्यांच्या कार्याची सुरुवात, समाजासाठी केलेले विविध उपक्रम, रुग्णसेवेला दिलेले प्राधान्य, तसेच रुग्णालयाच्या उभारणीपासून विस्तारापर्यंतचे महत्त्वाचे टप्पे सुलभ आणि ओघवत्या भाषेत मांडण्यात आले आहेत. अनेक आव्हानांचा सामना करत सेवा कार्य कसे उभे राहिले आणि वाढत गेले, याचेही चित्रण या पुस्तकात करण्यात आले आहे. त्यामुळे हे पुस्तक वैद्यकीय, सामाजिक आणि सेवाभावी क्षेत्रातील कार्यकर्ते, तरुण पिढी तसेच सर्वसामान्य वाचकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रक रुग्णालय कार्यकारिणीच्या अध्यक्षा डॉ. कीर्ती समुद्र आणि कार्यवाह राजीव समेळ यांनी पनवेल परिसरातील नागरिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, रुग्णालयातील उपचारांमुळे बरे झालेले रुग्ण तसेच वाचकवर्ग यांनी या प्रकाशन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.डॉ. प्रभाकर पटवर्धन रुग्णालय हे रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचालित सेवा कार्य असून, समाजातील सर्व घटकांना परवडणारी, विश्वासार्ह आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जात आहे. आरोग्यसेवेबरोबरच समाजोपयोगी उपक्रम, आरोग्य शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम या द्वारेही संस्थेचे कार्य विस्तारत आहे.

# डॉ.पतंगराव कदम शिष्यवृत्ती वितरण सोहळा उत्साहात

**कर्जत । प्रतिनिधी**



नवी मुंबई येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नवी मुंबईचथे डॉ. पतंगराव कदम शिष्यवृत्ती वितरण सोहळा २०२५- २६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.नवी मुंबई येथील बीव्हीसीओए (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर) येथे आयोजित शिष्यवृत्ती वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षण पोहोचावे, या उद्देशाने शिक्षणमहर्षी डॉ पतंगराव कदम यांनी रुजवलेल्या शैक्षणिक परंपरेचा हा उपक्रम एक महत्त्वाचा भाग आहे. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कदम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे आर्किटेक्ट स्मिता दास, प्राचार्य आर्क प्रा डॉ सतीश वाले, विभागप्रमुख, आर्क प्रा संस्कृती राजहंस, प्राध्यापकवर्ग तसेच कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी पाटील यांनी केले. आर्क प्रा. संस्कृती राजहंस यांनी शिष्यवृत्ती योजनेची माहिती देताना विद्यार्थ्यांसाठी तिचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्यांनी आपल्या भाषणात संस्थेची शैक्षणिक परंपरा व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची बांधिलकी यावर प्रकाश टाकला, तर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या सोहळ्यात एमएच-सीईटी व बारावीच्या गुणवत्तेच्या आधारे एकूण ३० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली, तसेच विविध वर्गामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा कामाक्षी वैद्यांनी आभार मानले हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# दिव्यात आंबेडकर जयंती निमित्त पोलीस व उत्सव मंडळ पदाधिकारी नियोजन बैठक संपन्न



**संतोष पडवळ । ठाणे**

१४ एप्रिल रोजी साजरी होणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने मुंब्रा पोलीस स्टेशनचे वपोनि अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दुपारी दिवा पोलीस चौकी येथे नियोजन बैठक घेण्यात आली. सदर नियोजन बैठकीमध्ये सपोनि कोळेकर, सपोनि सोनवणे यांनी सूचना व मार्गदर्शन केले. दि. १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करताना कोणीही आक्षेपार्ह घोषणा देणार नाही याची काळजी घ्यावी, आक्षेपार्ह गाणी वाजवीने टाळावे, उत्सवात कार्यक्रमाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे. उत्सवात प्रदूषण टाळण्यासाठी फटाक्याचा वापर टाळावा, मिरवणूक कार्यक्रम दिलेल्या वेळेत सुरु करून वेळेतच समाप्त करावा आदी बाबींचे पोलिसांनी मार्गदर्शन करून मिरवणूक व कार्यक्रमा दरम्यान कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहे. प्रसंगी बैठकी दरम्यान गोपनीय अंमलदार व आंबेडकर जयंती मंडळाचे अध्यक्ष व २० ते २५ पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ.गजानन रत्नपारखी यांची भाजप डॉ.सेलच्या अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गजानन रत्नपारखी यांची भाजप डॉक्टर सेलच्या मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र त्यांना मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. डॉ.



गजानन रत्नपारखी हे मुंबईतील प्रख्यात कार्डिओलॉजिस्ट आहेत. गुरुकृपा हार्ट फाऊंडेशनच्या माध्यमातून रत्नपारखी यांनी १३ नाईट स्कूल दत्तक घेतली आहेत. दरवर्षी चार हजार विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्याचे मोफत वाटप केले जाते. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी, गणवेश व ब्लँकेटचे वाटप डॉ. रत्नपारखी यांच्या संस्थेमार्फत केले जाते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची भाजपच्या मुंबई डॉक्टर सेलच्या (संयोजक) अध्यक्षपदी निवड केली आहे. तसेच सहसंयोजक पदी डॉक्टर प्रसाद सामंत, डॉक्टर अनिरुद्ध आंबेकर आणि डॉक्टर प्रसाद पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉक्टर गजानन रत्नपारखी यांच्या अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे समाजातील सर्वच स्तरातून त्यांचे मनापासून अभिनंदन करण्यात येत आहे. रत्नपारखी यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या क्लिनिकमध्ये मोठ्या संख्येने नागरिक त्यांची भेट घेण्यासाठी गर्दी करत आहेत.

# पुरोगामी महाराष्ट्र भोंदूबाबांच्या विळख्यात

महाराष्ट्र हे सर्वगुणसंपन्न राज्य मानले जाते. या भूमीला संत, समाजसुधारक आणि विचारवंतांचा समृद्ध वैचारिक वारसा लाभला आहे. म्हणूनच महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्र अशी ओळख मिळाली आहे. संत तुकाराम यांच्या अभंगांमधून समाजप्रबोधनाची प्रेरणा मिळाली. गावोगावी कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा आणि सामाजिक विकृतींवर प्रहार करण्याचे कार्य अनेक कीर्तनकारांनी केले. गाडगे बाबा यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून कीर्तनातून स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला.तसेच महात्मा जोतिबा फुले , राजश्री शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या मूल्यांची पायाभरणी महाराष्ट्रात केली. अशा पुरोगामी विचारांच्या भूमीत आज सुशिक्षित समाजदेखील भोंदू बाबांच्या विळख्यात सापडताना दिसतो, ही अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक बाब आहे.अलीकडे राज्यात चर्चेत आलेले स्वयंघोषित कॅप्टन खरात हे त्याचे ठळक उदाहरण ठरले आहे. खरंतर अशा प्रकारचे अनेक भोंदू बाबा महाराष्ट्रातील विविध भागांत सक्रिय असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. नाशिकमधील या प्रकरणाचे व्हिडिओ समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आयुष्य वेचणारे नरेंद्र दाभोळकर सर आज हयात असते, तर अशा अनेक भोंदू बाबांचा पर्दाफाश यापूर्वीच झाला असता, अशी भावना समाजात व्यक्त होत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या प्रकरणी जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत तक्रारीही दाखल केल्या आहेत. तरीही राज्यकर्त्यांच्या वरदहस्तामुळे अशा भोंदू बाबांना संरक्षण मिळते, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.काही वृत्तांनुसार २०१८ साली नाशिकमध्ये बांधकामासाठी निधीही संबंधित व्यक्तींना मिळाल्याची चर्चा आहे. राज्यकर्त्यांचे पाठबळ हेच भोंदू बाबांच्या फोफावण्यामागचे एक मोठे कारण असल्याचे दिसून येते. समाजातील अज्ञान आणि श्रद्धेचा गैरफायदा घेत अनेक भोंदू बाबा लोकांचे आर्थिक तसेच मानसिक शोषण करत आहेत.याहून गंभीर बाब म्हणजे महिलांचे होणारे लैंगिक शोषण .छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भूमीत महिलांचा सन्मान हा सर्वोच्च मानला जातो. अशा भूमीत महिलांवर अत्याचार होणे ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. त्यामुळे अशा भोंदू बाबांवर कठोर कारवाई होणे ही काळाची गरज आहे. २०१३ साली जादूटोणाविरोधी कायदा संमत होण्यात शहीद नरेंद्र दाभोळकर सर यांच्या संघर्षाचा मोठा वाटा आहे. या कायद्यामुळे अनेक भोंदू बाबांवर कारवाई झाली आहे. त्यांच्या पश्चातही अंधश्रद्धा निर्मूलन समिती समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करत आहे.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमे समाजातील घटनांना लोकांसमोर आणण्याचे प्रभावी साधन बनले आहेत. त्यामुळे समाजातील चुकीच्या प्रवृत्तींवर प्रकाश पडत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे देश झपाट्याने पुढे जात आहे. भारताने चांद्रयान मोहिमेद्वारे चंद्रावर यशस्वी झेप घेतली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा काळ सुरू आहे. परंतु विज्ञानाची प्रगती होत असतानाच समाजातील अंधश्रद्धा अजूनही पूर्णपणे नष्ट झालेली नाही, ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे सामाजिक आणि वैचारिक परिवर्तन घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे. समाजात जागृती निर्माण होणे हीच पुरोगामी महाराष्ट्राची खरी ओळख टिकवून ठेवणारी गोष्ट ठरेल.कॅप्टन खरातसारख्या भोंदू बाबांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. अशा प्रकरणांचा लवकर निकाल लागला तर इतर भोंदू बाबांनाही चाप बसेल. समाजात विवेक, विज्ञाननिष्ठा आणि मानवतावादी विचार रुजवणे हीच खरी गरज आहे. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचा नव्याने प्रसार होणे, हीच आजच्या काळातील खरी समाजप्रबोधनाची दिशा ठरेल.

–गिरीशकुमार तुकाराम कांबळे

# महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते 'देव घरा आयला'चे उद्घाटन!

## नाटकांची परंपरा जपणारे रांजणपाडा गाव–महेंद्रशेठ घरत

**उलवे । प्रतिनिधी**

पूर्वीच्या काळी जत्रा म्हणजे गावोगावी आनंदोत्सव असायचा. त्याकाळी बहुतांश घरांमध्ये फक्त जत्रेलाच मटन शिजायचे. त्यामुळे गावात मटनाचा सुगंध दरवळत असे. आलेल्या प्रत्येक पाहुण्याला हक्काने जेवायला दोन घास तरी खा, असा आग्रह केला जात असे. तसेच जत्रे निमित्ताने नाटक, कव्वालीचे सामने वा इतर मनोरंजनात्मक कार्यक्रम असायचे. ही परंपरा आजही काही गावांमध्ये जपली जातेय, त्यापैकीच उरण तालुक्यातील रांजणपाडा गाव. मंगळवारी रांजणपाडा गावची यात्रा होती. त्यानिमित्ताने जुन्याजाणत्या हौशी कलाकारांनी स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी 'देव घरा आयला' या नाटकाचा प्रयोग आयोजित केला होता. त्याचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आले.



त्यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, हसुराम पाटील यांच्यासारखे अनेक हरहुन्नरी कलाकार ग्रामीण भागात आहेत. त्यांच्या नसानसांत नाटक भिनले आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळी गावोगावी होणाऱ्या नाटकांची परंपरा ते आजही जपत आहेत. ते नवीन पिढीला सोबत घेऊन त्यांच्यात कलेचे बीज रोवत आहेत. वास्तवदर्शी नाटक सादर करण्यात त्यांचा हात कुणी धरू शकत नाही. लहान मुले, तरुण यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी नाटक बसवणे आणि त्याचे उत्तम सादरीकरण करणे, हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे रांजणपाडा ग्रामस्थांचे आणि उत्तम नाटक सादर करणारे कलाकार यांचे मनापासून अभिनंदन! मी कलेचा भुकेलेला आणि प्रोत्साहन देणारा आहे. मी नाटक वेडा आहे. पूर्वी मी शिवाजी मंदिरला नाटक पाहायला जायचो, आजही मला उसंत मिळाली नाटकाचा मोह आवरत नाही. कारण नाटक ही एक जिवंत कला आहे.

रांजणपाडा येथील 'अष्टगंध सांस्कृतिक, कला, सामाजिक मंडळा'च्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगळवारी ( ता. ७) धनेश्वर म्हात्रे लिखित व हसुराम पाटील दिग्दर्शित तसेच प्रसाद कडू सहदिग्दर्शक असलेल्या नाटकाचा प्रयोग रांजणपाडा (उरण) येथील हनुमान मंदिराच्या पटांगणात सादर करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत बोलत होते.

या नाटकाची निर्मिती रमेश चिंतामण कोळी यांची आहे. नाट्य मंडळाचे अध्यक्ष- अशोक कान्हा म्हात्रे, सचिव- दत्तात्रेय घरत, खजिनदार- प्रज्योत पाटील, सल्लागार- रंजन ठाकूर, नरेंद्र ठाकूर, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे यांच्या टीमने उत्तम कामगिरी केली आहे.

दिगंबर कोळी, मनोहर ठाकूर यांची संकल्पना आणि धनेश्वर म्हात्रे, हसुराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, दिगंबर कोळी, सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, वैभव म्हात्रे, प्रसाद कडू, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परीशा सरोदे, व रुद्र ठाकूर आदी कलाकारांनी आपल्या अभिनयाने रसिकांना जिंकले. आनंद कुबल यांचे संगीत, राजा जोशी यांचे नेपथ्य, डी. वाय. म्हात्रे यांची रंगभूषा, संतोष साऊंड सर्विस यांची रंगमंच व्यवस्था प्रशंसनीय होती. आगरी संस्कृती, आगरी भाषेतील गोडवा, आगरी रुढी-परंपरा व नातेसंबंधांवर आधारित वास्तवदर्शी 'देव घरा आयला' हे नाटक रसिकांच्या मनात कायम घर करेल, अशा भावना यावेळी रसिकांनी व्यक्त केल्या.

## बाळू कृष्णा पार्टे यांचे दुःखद निधन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र पोलीस कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते बाळू कृष्णा पार्टे यांचे शनिवार दिनांक ४/४/२०२६ रोजी वयाच्या ७५ वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचा उत्तरक्रिया विधी बुधवार १५/४/२०२६ रोजी सकाळी त्यांच्या राहत्या घरी बोरी, पानसरे आळी, उरण येथे होणार आहे. मनमिळाऊ व सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणारे बाळू पार्टे हे गोर गरिबांच्या अडी अडचणीत गोरगरिबांना ते मदत करत असल्याने त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केला जात आहे.एक कर्तव्य दक्ष व प्रामाणिक पोलीस कर्मचारी म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होती. सेवानिवृत्त झाल्या नंतरही त्यांनी आपल्या आयुष्यात अनेकांना मार्गदर्शन, मदत केली आहे. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली ,बारा नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.२ मुले महाराष्ट्र पोलीस विभागात कार्यरत आहेत , एक आर्मी मध्ये तर एक नात पीएसआय आहे.देश सेवेला वाहून घेतलेले हे कुटुंब आहे.बाळू पार्टे यांच्या निधनाने पार्टे कुटूंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. त्यांच्या मृत्यू झाल्याने सर्वत्र मोठ्या प्रमाणात शोक व्यक्त केला जात आहे.या दुःखद प्रसंगी व विधी प्रसंगी कुठल्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नसल्याचे त्यांच्या कुटुंबियांनी कळविले आहे.



**ठाणे : कोपरी उड्डाणपुलावर साकेत उन्नत मार्गाच्या कामादरम्यान हायड्रॉलिक क्रेन कोसळल्याची घटना घडली. या घटनेमुळे ठाण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेनंतर वाहतूक विभाग आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू झाले. दरम्यान, या घटनेमुळे वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. ( फोटो – संतोष पडवळ )**



# ठाणे जिल्हयांमध्ये ८ ते १४ एप्रिल दरम्यान 'सामाजिक समता सप्ताह'

**संतोष पडवळ । ठाणे**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे संपूर्ण राज्यात ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे आणि महामानवांच्या विचारांचा जागर करणे हा मुख्य उद्देश आहे.

या सात दिवसांत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ८ एप्रिल: सप्ताहाचे उद्घाटन आणि प्रत्येक कुटुंबाला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतीचे वाटप केले जाईल, ९ व १० एप्रिल: शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर व्याख्याने, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जातील. तसेच 'चवदार तळे सत्याग्रह' शताब्दी वर्षानिमित्त मानवी हक्कांवर विशेष कार्यक्रम होतील, ११ एप्रिल: महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील, १२ एप्रिल: 'संविधान जागर' अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले जाईल. तसेच महिलांसाठी विशेष मेळावे आयोजित करून डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या प्रगतीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली जाईल, १३ एप्रिल: ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे, आरोग्य विभागाच्या मदतीने रक्तदान शिबिरे आणि विविध वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबवले जाईल. या दिवशी जिल्हा जात पडताळणी कार्यालयामार्फत ऑनलाईन वैधता प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात येईल, १४ एप्रिल: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी त्यांना अभिवादन करून सप्ताहाचा समारोप होईल. यावेळी शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्यावर विशेष व्याख्याने आयोजित केली जातील.जिल्हास्तरावर सामाजिक कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त या सर्व कार्यक्रमांची जबाबदारी सांभाळणार असून ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)